**राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या कार्यकारी समितीवर विविध क्षेत्रातील तज्ञांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००५/प्रक्र-८३/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक ३० एप्रिल, २००५**

**वाचा :-** शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु-१००४/ प्रक्र-४७/ पापु-०७, दिनांक २ एप्रिल, २००४

**प्रस्तावना :-**

स्वजलधारा योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान या केंद्र शासन पुरस्कृत योजनांचे राज्य स्तरावरील अपेक्षित संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, संनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षित कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी **"राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन"** गटीत करून या मिशनमध्ये **"शिखर समिती"** व **"कार्यकारी समिती"** या दोन समित्यांची स्थापना संदर्भातील दिनांक २ एप्रिल, २००४ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. **कार्यकारी समिती** ही राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनची कार्यकारी स्वरूपाची समिती असून **शिखर समितीला** सहाय्य करणे व सल्ला देणे हीसुध्दा या समितीची जबाबदारी आहे. या कार्यकारी समितीवर पाणी पुरवठा, ग्राम विकास, सामुहिक आरोग्य, स्वच्छता, सामुदायिक संघटना, प्रसार माध्यमे व सेवाभावी संस्था अशा क्षेत्रातील तज्ञांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्याची तरतूद आहे. त्यानुसार राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यकारी समितीवर या तज्ञांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून, राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यकारी समितीवर पुढील पदांवर कार्यरत व्यक्तींची / संस्थांची स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

(अ) राज्यात राबविण्यात येत असलेल्या **जलस्वराज्य** प्रकल्पात पुढील पदांवर कार्यरत व्यक्ती:-
१) संस्थीय व समाज विकास तज्ञ
२) आरोग्य व स्वच्छता तज्ञ
३) समाज विकास तज्ञ
४) माहिती, प्रचार व प्रसिध्दी तज्ञ
(ब) संवाद व क्षमता विकास कक्षाचे राज्य समन्वयक
(क) (१) संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र
(२) संचालक, दूरदर्शन, मुंबई केंद्र

(ड) स्वयंशिक्षण प्रयोग (SSP) या स्वयंसेवी संस्थेचा **प्रतिनिधी.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६) अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई
८) राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीचे व कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
९) सर्व मंत्रालयीन विभागाचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव
१०) कार्यक्रम अधिकारी, युनिसेफ, मुंबई.
११) वॉटर अॅड सॅनिटेशन प्रोग्रॅम (साऊथ एशिया) (WSP-SA), नवी दिल्ली.
१२) श्री. पोपटराव बागुजी पवार, सरपंच, ग्रामपंचायत, हिवरेबाजार, ता. जि. अहमदनगर
१३) जिल्हा कार्यकारी समितीचे सर्व सदस्य
१४) संस्थीय आणि समाज विकास तज्ञ (श्रीमती जयलक्ष्मी चेक्कला)
१५) आरोग्य व स्वच्छता तज्ञ (डॉ. मनोज वर्मा)
१६) समाज विकास तज्ञ (श्रीमती उषा महेश्वरी)
१७) माहिती, प्रचार व प्रसिध्दी तज्ञ (श्रीमती अश्विनी जठार)
१८) राज्य समन्वयक, संवाद व क्षमता विकास कक्ष, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई
१९) संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र
२०) संचालक, दूरदर्शन, मुंबई केंद्र
२१) स्वयंशिक्षण प्रयोग (SSP), मुंबई
२२) विभागीय आयुक्त (सर्व)
२३) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
२४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२५) प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प
२६) संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे.
२७) जिल्हाधिकारी (सर्व)
२८) प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२९) उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
३०) जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
३१) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
३२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
३३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३४)निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग